ePaper


## लाथ मारणं, हुज्जत घालणं भोवलं... शिवराज राक्षे, महेंद्र गायकवाड निलंबित!



| वर्ष - 8 | अंक - 203 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 3 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- अभिषेकने मोडला हिटमॅनचा विक्रम!
- त्रिशाचा विश्वचषकात वर्ल्ड रेकॉर्ड
- ISIS च्या तळांवर अमेरिकेचं स्ट्राइक
- कानडा राजा ५५ वर्षांपासून चर्चेत


### राज्यात लवकरच महिलांच्या न्यायासाठी कायदा

# समान नागरी कायद्याची नांदी!

## डॉ. नीलम गोऱ्हे यांचे मोठे संकेत, विरोधकांच्या भुवया उंचावल्या

। पुणे । महाईन्यूज

**लिंगभाव समानतेसाठी देशात समान नागरी कायद्याची आरोळी ठोकण्यात आली आहे. महिलांना न्याय द्यायचा असेल तर या कायद्याची गरज असल्याचे प्रतिपादन करण्यात येत आहे. विधान परिषदेच्या उपसभापति डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तर राज्यात थेट समान नागरी कायदा लागू होईल, असे थेट संकेत दिले आहे. पुण्यातील एका कार्यक्रमात त्यांनी केलेल्या या विधानाने विरोधकांच्या भुवया उंचावल्या आहेत.**



देशात मोदी सरकारच्या काही कायद्यांवरुन विरोधकांनी गदारोळ केला होता. त्यात समान नागरी कायदा हा पण एक वादाचे कारण आहे. या कायद्याची रुपरेषा स्वातंत्र्याच्या सुरुवातीलाच तयार होती, असा दावा सरकारने केलेला आहे. विश्व मराठी संमेलनाच्या आचार्य प्र.के. अत्रे मंचावर महिलांविषयक कायदे आणि न्याय मराठी भाषा याविषयावर बोलताना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी समान नागरी कायद्याची हिरारीने बाजू मांडली.

### काय म्हणाल्या डॉ. गोऱ्हे

लिंगभाव समानता आणण्याबरोबरच महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळण्यासाठी देशात समान नागरी कायदा लागू झाला पाहिजे,’ असे मत व्यक्त करतानाच, ‘महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा लागू होईल,’ असे संकेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी दिले. ‘न्यायदेवता डोळ्यांवरील पट्टी काढून महिलांना न्याय देण्याचे काम करीत आहे. फौजदारी आणि दिवाणी न्यायालयांमध्ये निकालपत्रे मराठी भाषेत देण्यासाठीची कार्यवाही मराठी भाषा विभागाने करावी,’ असे निर्देशही त्यांनी दिले.

### उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू


नवीन राज्य निर्मितीत वर्ष 2000 मध्ये उत्तराखंड राज्य अस्तित्वात आले. 27 जानेवारी रोजी या राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात आला. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी ही घोषणा केली. हा कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. गेल्यावर्षी 7 फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने नागरी कायदा मंजूर केला होता. त्यानंतर 18 ऑक्टोबर 2024 रोजी याविषयीच्या समितीने समान नागरी कायद्याचा अहवाल दिला होता. त्यानंतर यावर्षी हा कायदा लागू करण्यात आला. त्यानंतर आता भाजपशासित अनेक राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासाठी पुढाकार घेण्यात येत असल्याचे दिसते.

### प्राधिकरण निगडी परिसरात बिबट्याचा शिरकाव

## बिबट्याला जेरबंद करण्यात रेस्क्यू टीमला यश, नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला

। पिंपरी ।महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील प्राधिकरण, निगडी येथील संत कबीर उद्यान परिसरात आज सकाळी बिबट्याने शिरकाव केला होता. लोकवस्तीत शिरलेल्या या बिबट्याला तब्बल अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर जेरबंद करण्यात रेस्क्यू टीमला यश आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.**







आज सकाळी प्राधिकरण येथील संत कबीर उद्यान परिसरात एक नव्हे तर दोन बिबटे दिसल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला होता. मात्र या परिसरात एकच बिबट्या आढळून आला आहे. सुरुवातीला या ठिकाणच्या एका बंगल्यात हा बिबट्या आढळून आला होता. त्यानंतर त्याने शेजारीच असलेल्या संत कबीर उद्यानात धाव घेतली. तेथे एका शेडमध्ये तो लपून राहिला होता. दरम्यान बिबट्याला जेरबंद करण्याकरिता वनविभागासह रेस्क्यू टीम देखील या ठिकाणी दाखल झाली होती. त्यांनी तब्बल अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर या बिबट्याला बेशुद्ध करून जेरबंद केले आहे

# पृथ्वीराज ठरला यंदाचा महाराष्ट्र केसरी!

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेत गोंधळ, राक्षेने पंचाला लाथ मारली?

। पुणे ।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

**अहिल्यानगरमध्ये आज (२ फेब्रुवारी) महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. या सामन्यात पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहळने पैलवान महेंद्र गायकवाडवर मात करत महाराष्ट्र केसरी किताब पटकावला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहोळने अंतिम फेरीत बाजी मारत ६७ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेची गदा पटकावली आहे.**





पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पैलवान पृथ्वीराज मोहळला चांदीची गदा आणि थार गाडी देण्यात आली आहे. पृथ्वीराज मोहळने महाराष्ट्र केसरीची गदा जिंकल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष केला.अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मात्र, आज (२ फेब्रुवारी) या स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामन्यात मोठा गोंधळ झाल्याचं पहायला मिळालं. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्यामुळे स्पर्धेला गालबोट लागलं.उपांत्य फेरीचा सामन्यात पैलवान शिवराज राक्षेचा पराभव झाल्याचा निर्णय पंचांनी दिला. मात्र, पैलवान शिवराज राक्षेने पंचांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नाराजी व्यक्त करत पंचाला लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला.पैलवान पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यात उपांत्य फेरीचा कुस्तीचा सामना रंगला होता. मात्र, पैलवान पृथ्वीराज मोहोळकडून शिवराज राक्षे पराभूत झाला. पण पराभूत होताच शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे मैदानात काहीवेळ गोंधळाची परिस्थिती पाहायला मिळाली. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मध्यस्थी केल्याने वाद काहीसा निवाळला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. हा गोंधळ झाल्यानंतर शिवराज राक्षेने या सामन्याचा रिव्ह्यू घेण्याची मागणी केली होती.महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या निकालाबाबत बोलताना शिवराज राक्षेने म्हटलं की, “माझी पाठ टेकली नव्हती. त्यामुळे हा निकाल आपल्याला मान्य नाही”, तसेच लाथ मारल्याचे आरोपही शिवराज राक्षे यांनी माध्यमांशी बोलताना फेटाळून लावले. त्यामुळे आता या स्पर्धेच्या निकालाबाबत पंच आणि कुस्ती महासंघ काय निर्णय घेतात? तसेच या वादाबाबत काय भूमिका मांडतात याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे.महाराष्ट्र केसरी स्पर्धा अहिल्यानगरमध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. आज या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा उपांत्य सामना पार पडत होता. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. मात्र, यावेळी पैलवान शिवराज राक्षे आणि पैलवान पृथ्वीराज मोहोळ यांच्यामध्ये सामना रंगला. मात्र, काही वेळातच शिवराज राक्षे पराभूत झाल्याचा निर्णय पंचांनी दिली. त्यामुळे पैलवान शिवराज राक्षे हा संतापल्याचं पहायला मिळालं. तसेच शिवराज राक्षे याने पंचांना लाथ मारल्याचा आणि पंचांची कॉलर पकल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा गोंधळ सुरु असतानाच त्या ठिकाणी अजित पवार हे देखील उपस्थित होते. हा गोंधळ झाल्यानंतर शिवराज राक्षेने या सामन्याचा रिव्ह्यू घेण्याची मागणी केली. त्यामुळे आता याबाबत पंच काय निर्णय घेतात ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

### अजित पवारांसमोरच स्पर्धेत गोंधळ

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पैलवान पृथ्वीराज मोहळला चांदीची गदा आणि थार गाडी देण्यात आली आहे. पृथ्वीराज मोहळने महाराष्ट्र केसरीची गदा जिंकल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष केला.अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मात्र, आज (२ फेब्रुवारी) या स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामन्यात मोठा गोंधळ झाल्याचं पहायला मिळालं. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्यामुळे स्पर्धेला गालबोट लागलं.उपांत्य फेरीचा सामन्यात पैलवान शिवराज राक्षेचा पराभव झाल्याचा निर्णय पंचांनी दिला. मात्र, पैलवान शिवराज राक्षेने पंचांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नाराजी व्यक्त करत पंचाला लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला. पैलवान पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यात उपांत्य फेरीचा कुस्तीचा सामना रंगला होता.

# तुम्ही आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे

## अभिनेत्यांना पुरस्कार, आमच्या वाट्याला तिरस्कार : राज ठाकरे

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुण्यात तिसरे विश्व मराठी संमेलन आज पार पडले. हे विश्व मराठी संमेलन मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. आज या संमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह आदी दिग्गज उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी मराठी भाषेसह विविध विषयांवर भाष्य केलं.**

राज्य सरकारने आणि आम्ही-तुम्ही सर्वांनी आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे, असं आवाहनही राज ठाकरे यांनी केलं. याच कार्यक्रमात राज ठाकरे यांनी एक विधान केलं. ‘अभिनेत्यांना पुरस्कार मिळतो, पण आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो’, असं म्हणत राज ठाकरे यांनी तुफान फटकेबाजी केली. तुमच्या मनात आलं असेल की मी या ठिकाणी कसा? हा शासनाचा कार्यक्रम आहे. पण मला उदय सामंत यांनी या कार्यक्रमासाठी बोलावलं. त्यामुळे मला तुमचं सर्वांचं दर्शन झालं. त्यासाठी मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार



देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील. सयाजी शिंदे यांनी आता सांगितलं की त्यांनी आफ्रिकेतील व्यक्तीशी मराठीत कसं भांडण केलं. आपण आपल्या भाषेवर नेहमी ठाम राहिलं पाहिजे. कारण जग तुम्हाला त्यानंतरच दाद देतं”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.दुसऱ्या देशातील माणसं हे आपल्या देशाशी आणि भाषेशी खूप प्रामाणिक असतात. मग त्यांचा अभिमान आपल्यालाही वाटायला लागतो की ते त्यांच्या भाषेशी किती प्रामाणिक आहेत. आपल्या देशात सुद्धा स्वत:च्या भाषेशी प्रामाणिक आहेत. आपल्या देशातील दुसरे राज्य जर त्यांच्या भाषेबाबत एवढा अभिमान बाळगून असतील तर आपण दुसऱ्या भाषेत का बोलतो? एकमेकांना भेटल्यानंतर दुसऱ्या भाषेत कशासाठी बोलतो? आता कार्यक्रमात आपल्याकडे राज्यगीत लागलं होतं. जय जय महाराष्ट्र माझा.., मग भारतातील दुसऱ्या राज्यात कोणत्या राज्याचं राज्यगीत आहे?”, असंही राज ठाकरे म्हणाले. “ज्या हिंद प्रांतावर १२५ वर्ष कोणी राज्य केलं असेल तर ते फक्त मराठ्यांनी केलं. ज्यांनी १२५ वर्ष राज्य केलं.

### राज ठाकरे काय म्हणाले?

मराठी भाषेसाठी जे-जे आम्ही करू त्यासाठीही ते पाठिंबा देतील अशी देखील अपेक्षा आहे. पण तेव्हा आमच्यावर गुन्हे दाखल करू नका. आतापर्यंत आलेला अनुभव आहे. कारण आम्ही जे करत आहोत ते मराठी भाषेसाठी आणि महाराष्ट्रासाठीच करत आहोत”,मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील.

## एमआयडीसी प्रीमियर लीग

# प्रगती वॉरियर्स विजयी, सह्याद्रीला उपविजेतेपद

## चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेचा पुढाकार

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेच्या वतीने चिखली येथे घेण्यात आलेल्या एमपीएल क्रिकेट स्पर्धेत प्रगती वॉरियर्स संघाने विजेतेपद तर सह्याद्री आंत्रप्रेन्यूअर्स संघाने उपविजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण सोहळ्यासाठी कामगार नेते यशवंत भोसले, बी एन आय पिंपरी चिंचवडचे संचालक देवानंद देशमुख, नेत्रा सेल्सचे संचालक नितीन खाटेकर, उद्योजक कौस्तुभ मुरुडवार व अजय मुंगडे तसेच शेकडो उद्योजक उपस्थित होते.**



अतिशय चुरशीच्या झालेल्या या संपुर्ण क्रिकेट स्पर्धेमध्ये उद्योजक लक्ष्मण काळे यांच्या प्रगती वॉरियर्स संघाने विजेतेपद पटकावले. उद्योजक जयदेव अक्कलकोटे यांच्या सह्याद्री आंत्रप्रीन्युअर्स यांना उपविजेते पद मिळाले व उद्योजक विश्वास निकत यांच्या पी व्ही एन लिजंड्स संघाला तिसऱ्या स्थानावरती समाधान मानावे लागले. यावेळी जयदेव अक्कलकोटे यांनी २८ चेंडूत ९६ धावा काढल्या. तसेच 6 चेंडूवर सलग 6 षटकार मारत रोमहर्षक कामगिरी केली. यामुळे खेळाला निर्णायक वळण मिळाले.

चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जयदेव अक्कलकोटे व त्यांच्या उद्योजक संघटनेतील ऊद्योजकांनी ५ वर्षापूर्वी कंपनीचे मालक व त्यामधील कामगार यांच्यामधील दरी कमी करण्यासाठी क्रिकेट या खेळाचे माध्यम तयार करून भव्य अशी एम पी एल क्रिकेट स्पर्धा सुरू केली. यामध्ये आत्तापर्यंत कंपन्यांच्या शेकडो कामगारांनी सहभाग घेतला होता.

यावेळी चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जयदेव अक्कलकोटे म्हणाले की, यावर्षी प्रथमच फक्त कंपन्यांचे मालक यांना एकत्र घेऊन भव्य असे एम पी एल क्रिकेट स्पर्धा 2025 सीजन 5 हे चाकण भोसरी एमआयडीसी उद्योजक संघटनेने आयोजित केली होती. यामध्ये 100 पेक्षा जास्त उद्योजकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी एम पी एल कोअर कमिटीचे प्रमुख जयदेव अक्कलकोटे, मुख्य समन्वयक सीए ऋषी खळदकर, उद्योजक निखिल देशमुख, चाकण एमआयडीसी उद्योजक संघटनेचे संचालक प्रवीण शिंदे,प्रशांत गोरे, सचिव निवास माने, खजिनदार किसन गायकवाड, उद्योजक पंकज ढवळे, सिद्धार्थ राणे, सुभाष गोळे आदींनी यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले .

या स्पर्धेकरिता अभिजीत प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेड, बी एन आय पिंपरी चिंचवड, नेत्रा सेल्स अँड सर्व्हिस, कौस्तुभ एंटरप्राइजेस व टूलकॉन सिस्टीम यांचे प्रायोजकत्व लाभले.

### बक्षिसाचे स्वरुप

मॅन ऑफ दी सिरीज – जगदीश रेड्डी
बेस्ट बॅट्समन – जयदेव अक्कलकोटे
बेस्ट बॉलर – वेदांत मामिदवार
बेस्ट फिल्डर – विश्वास निकत

### उद्योजकता विकास साधण्याचा प्रयत्न

29 व 30 जानेवारी 2025 रोजी चाललेल्या या स्पर्धा सिल्वर क्रिकेट अकॅडमी स्टेडियम चिखली येथे पार पडल्या. या स्पर्धेसाठी उद्योजकांना एकत्र घेऊन त्यांचे संघ तयार करण्यासाठी जवळपास 2 महिने दर गुरुवारी प्रत्येक उद्योजकाचा खेळ बघून त्याचे ग्रेडिंग करण्यात आले व त्यानंतर प्रत्येक संघामध्ये त्याच तोडीचे उद्योजक खेळाडू हे देण्यात आले त्यामुळे सहभागी सर्व संघ हे समतुल्य होते. पुढच्या वर्षी देखील यापेक्षा भव्य दिव्य अशी एम पी एल क्रिकेट स्पर्धा भरून जास्तीत जास्त कंपन्यांच्या मालकांना खेळाच्या माध्यमातून एकत्र आणून उद्योजकता विकास साधण्याचा प्रयत्न राहील. असे ते शेवटी म्हणाले.

---

# मालमत्ता कर व्याज माफीसाठी अभय योजना राबवा

## विशाल काळभोर यांची आग्रही मागणी

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने सध्या कर वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. महापालिका प्रशासन मालमत्ता कर हा 'जिझिया कर' वसुलीप्रमाणे जबरदस्तीने वसुली करत आहेत. मालमत्ता कर थकल्यामुळे यावर मोठ्या प्रमाणात व्याज लावले आहे. त्यामुळे मालमत्ता करावरील व्याज माफीसाठी अभय योजना राबवा, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष विशाल बाळासाहेब काळभोर यांनी केली आहे.**






याबाबत काळभोर यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळ्या जागा, मिश्र अशा 6 लाख 35 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तसेच महापालिकेच्या वतीने नोंदणी नसलेल्या नवीन मालमत्ता कर कक्षेत आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या नव्याने नोंदणी झालेल्या मालमत्तांमधून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे. त्यामुळे थकीत कर वसुलीसाठी महापालिका प्रशासनाने जोर जबरदस्ती करणे योग्य नाही.

कोरोना महामारीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे नागरिकांचा मालमत्ता कर थकला आहे, ही वस्तुस्थिती असली तरी कोरोना महामारीतून आताशी नागरिक सावरत आहेत. मात्र, महापालिका प्रशासन मालमत्ता कर वसुलीसाठी काही प्रमाणात अतिरेक करत आहे. अनेक नागरिकांची मालमत्ता कर भरण्याची तयारी आहे. मात्र, कर आणि व्याजाची रक्कम भरणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून व्याज माफ करण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात यावी, अशी मागणी काळभोर यांनी केली आहे.

# भारतीय रायफल शूटिंग संघात निवड झाल्याबद्दल तेजस वाघेरे याचा सन्मान



। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरीगावातील २२ वर्षीय नेमबाज तेजस वाघेरे-पाटील याची भारतीय शूटिंग (नेमबाजी) संघात निवड झाली असून तो आंतरराष्ट्रीय शूटिंग स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल आणि २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल या दोन प्रकारात खेळणार आहे. तेजस हा पिंपळे सौदागर येथील एक्सलन्स शूटिंग स्पोर्ट्स क्लबमध्ये सौरभ साळवने यांच्या मार्गदर्शनाखाली तीन वर्षांपासून सराव करतो आहे. अतिरिक्त प्रशिक्षणासाठी तो म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलातील शूटिंग रेंजवर सराव करतो. त्याच्या सततच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याला देशातील प्रथम ५० खेळाडूंच्या यादीत स्थान मिळाले असून त्याची ६७ व्या भारतीय शूटिंग अजिंक्यपद स्पर्धा आणि निवड चाचणीसाठी निवड झाली आहे. दिल्लीच्या साई सेंटरमध्ये प्रशिक्षणानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय संघातर्फे खेळण्याची संधी त्याला मिळणार आहे, त्याला प्रोत्साहन देण्याकरिता अभिमन्यू मित्र मंडळ पिंपरी गाव यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.




# प्रजासत्ताकाचा पायाच पोकळ!

**अनास्थेची लागण प्रत्यक्ष एखाद्या साथीच्या रोगापेक्षाही भयानक असते. राज्यातील कथित प्रगत शहर पुणे सध्या याचा अनुभव घेते आहे. पुण्यामध्ये गुइलेन बॅरे सिंड्रोमनामक (जीबीएस) आजाराची लागण होण्याचे प्रमाण प्रचंड आहे. हा आजार नवीन नाही, पण त्याचे रुग्ण ज्या प्रमाणात वाढताहेत, ते मात्र घाबरवणारे आहे.**

हे प्रमाण कशामुळे वाढते, याच्या खोलात गेल्यावर जे दिसते, ते राजकीय हव्यासाचे आणि प्रशासकीय अनास्थेचे किळसवाणे रूप.अर्थात, हे पुण्यात झाले म्हणून किमान त्याची चर्चा तरी होते. तिकडे बुलढाण्यात एका गावात अचानक सुरू झालेल्या केसगळतीची नुकतीच घडलेली घटना आता कुणाच्या खिजगणतीत तरी आहे का, हा प्रश्नच. विदर्भाच्या वाट्याला आलेल्या अनास्थेचा अनुशेष काही भरून निघायला तयार नाही. पुण्यातील या 'जीबीएस'नामक आजाराची लागण होणे खरे तर नवीन नाही. दूषित पाणी वा अन्नामुळे पचनसंस्थेत बिघाड होऊन एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर शरीरात शिरलेल्या विषाणू व जिवाणूंशी मुकाबला करणारी शरीरातील रोगप्रतिकारशक्ती काही वेळा अनाकलनीयपणे इतकी प्रचंड वाढते, की शिरलेले विषाणू व जिवाणू मेल्यानंतर या वाढलेल्या प्रतिकारशक्तीला काय करायचे, हे उमजत नाही. ती मग



शरीराच्या मज्जासंस्थेवर हल्ला करते. त्यामुळे स्नायूंवर आघात होऊन गिळण्यास वा श्वसनास प्रचंड अडथळे, हातापायातील त्राण जाणे, पक्षाघात असे विकार उद्भवतात. ही स्थिती गुदरलेल्या व्यक्तीला आधीच काही सहव्याधी असतील, तर तिची प्रकृती अधिक नाजूक होऊन ती व्यक्ती दगावूही शकते. ही लक्षणे असलेले रुग्ण यापूर्वीही होते. फक्त त्यांची संख्या कमी होती. गेल्या वर्षी पुण्यात वर्षभरात असे १८५ रुग्ण आढळले. यंदा त्याचे गांभीर्य अधिक नजरेत भरले, कारण जानेवारीच्या एकाच महिन्यात रुग्णसंख्या शंभराच्या जवळपास जाऊन ठेपली. पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील एका भागात ही संख्या वेगाने वाढली. बाधित भाग हा अगदी पूर्वीपासून महापालिका हद्दीतील नाही. काही वर्षांपूर्वी 'राजकीय' सोयीसाठी महापालिकेला जोडला गेला. या भागाचे वैशिष्ट्य असे, की तो महापालिकेला जोडण्यापूर्वीच येथे जमिनी विकून उंच इमारती बांधल्या गेल्या. त्या एकदा विकायच्या ठरल्या, की बांधकाम व्यावसायिकांना आणि त्या स्वस्तात आहेत म्हटल्यावर ग्राहकांना, 'या इमारतींना पाणीपुरवठा कसा केला जाणार, सांडपाणी कसे वाहून नेले जाणार,' असले प्रश्न पडतच नाहीत. इमारती उभ्या राहतात, लोक राहायला येतात आणि मग हे प्रश्न पडायला सुरुवात होते. त्याची तीव्रता वाढते, ती असे 'जीबीएस'सारख्या आजाराचे रुग्ण वाढू लागल्यावर. आता पुण्यातला जो भाग 'जीबीएस'ग्रस्त आहे, तो आहे खडकवासला धरणाजवळ. तेथून साऱ्या पुण्याला पाणीपुरवठा होतो. मात्र, या भागातील बहुतांश इमारती पाण्याची तहान भागविण्यासाठी अवलंबून आहेत टँकरवर! का? तर ही गावे महापालिकेला जोडल्यावर त्यांना आवश्यक असलेला अतिरिक्त पाणीकोटा राज्य सरकारने मंजूरच केलेला नाही म्हणून.परिणामी, महापालिका या भागांना मोफत टँकर पुरवते. पण, तेवढे पाणी पुरत नाही, त्यामुळे पैसे मोजून खासगी टँकर बोलावले जातात. टँकरवाल्यांची लॉबी कशा प्रकारे नाडते, हे राज्यातील प्रत्येकच शहर अनुभवते. कागदोपत्री टँकरना 'जीपीएस ट्रॅकर' वगैरे लावून त्यांच्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना आहेत. पण, प्रत्यक्षात या टँकरमध्ये नेमके कुठले पाणी भरले जाते, याची काहीच तपासणी होत नसल्याने त्या केवळ वदंताच ठरतात. थोडक्यात, या टँकरद्वारे दिलेले पाणी पिण्यास योग्य आहे वा अयोग्य, याचा काहीच मापदंड नाही. मध्यंतरी पुण्यातील अन्य एका भागातील सोसायटीत टँकरद्वारे चक्क अर्धवट पुनर्प्रक्रिया केलेले सांडपाणी रग्गड पैसे घेऊन विकले जात होते. रहिवाशांना त्रास व्हायला लागल्यावर हा प्रकार उघडकीस आला आणि कारवाई झाली. 'जीबीएस'ग्रस्त खडकवासल्याजवळील भागात हे होत नसेल, असे ठामपणे सांगता येत नाही. शिवाय या भागात एक पूर्वापार विहीर आहे, ज्यात धरणातील पाणी जलवाहिनीद्वारे आणून साठवले जाते, जे पंपांद्वारे उचलून नागरिकांकडून वापरले जाते.

## प्रासंगिक »

# मौनी ममता!

***एरवी एखादा फटाका फुटला तरी 'वहां का माहौल' सांगण्यास उतावळ्या वृत्तवाहिन्यांनी कुंभ दुर्घटनेबाबत पाळलेली 'मौनी अमावास्या' डोळ्यात न भरणे अवघड...***

एखाद्या विषयाची किती हवा करायची याचा काही एक विवेक असावा लागतो. हा विषय वैयक्तिक श्रद्धेसारखा भावनिक असेल आणि त्याची हवा तयार करणारे सत्ताधारी असतील तर या विवेकाची गरज अधिक. भावनेस हात घालणे सोपे. बुद्धिगम्य वैज्ञानिकता मनी रुजवणे कित्येक पटींनी अवघड. हे सत्य लक्षात घेतल्यास विद्यमान राज्यकर्त्यांनी प्रयागराज येथील 'महाकुंभ'ची वातावरण निर्मिती केली ती किती घातक होती हे बुधवार पहाटेच्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून समजावे. जे झाले ते निर्विवाद दु:खदायक. इतके की प्रत्यक्ष किती जणांचे आयुष्य शब्दश: गंगार्पणमस्तु झाले हे सांगण्यासही दिवसभरात कोणी धजावत नव्हता. 'बीबीसी'सारख्या वृत्तसेवेनुसार 'जखमीं'स दाखल केलेल्या रुग्णालयात माध्यमकर्मीस मज्जाव होता. तो का न कळे. कारण गंगाकिनाऱ्यास प्रेतांच्या ढिगाऱ्यांचे नावीन्य नाही. कोविडकाळात देशाने ते पाहिले.

पूर्वसुरींच्या अनुभवसिद्ध नेणतेपणाची यथेच्छ चेष्टा करत स्वत:च्या असिद्ध कर्तृत्वाचे ढोल बडवणारे प्रस्थापित झाले की पूर्वसुरींच्या मार्गानेच जाण्याची वेळ कशी येते याची उदाहरणे अनेक.अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणुकीस आणि विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीस मुभा देण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात आहे.

# राजीखुशीने आपली सेवा सत्ताचरणी सादर

अमेरिकेशी मनमोहनसिंग यांनी केलेल्या अणुकराराची संभावना भाजपने त्या देशापुढे 'शरणागती', 'अमेरिकेचे मांडलिकत्व' आदी शेलक्या विशेषणांनी केली आणि ते 'मांडलिकत्व', 'शरणागती' टाळण्यासाठी अणुऊर्जा कंपन्यांवरील निर्बंधांचा हट्ट धरला. तथापि ताज्या अर्थसंकल्पात तो हट्ट सोडण्याची तयारी दाखवण्याची वेळ त्याच भाजपवर आली असून ही माघार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लवकरच वॉशिंग्टनी डोनाल्ड ट्रम्प दरबारी सादर होणे याचा काहीही संबंध नाही असे मानणे शतमूर्खपणाचे ठरेल. भारतीय उत्पादनांवर अधिक जकातीची कुऱ्हाड टाळावयाची असेल तर भारतास अधिकाधिक खरेदी अमेरिकी कंपन्यांकडून करावी लागेल, असा स्पष्ट इशारा ट्रम्प यांनी दिल्यानंतर आलेले हे शहाणपण. जी बाब कोणत्याही धमकीशिवाय मनमोहनसिंग सन्मानपूर्वक करू पाहात होते ती आता आपणास अमेरिकी दडपणाखाली मान




खाली घालून स्वीकारावी लागणार. तीच बाब विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणूक करू देण्याबाबत. आज जगातील पहिल्या पाच विमा कंपन्यांत दोन अमेरिकी, दोन चिनी आणि एक जर्मन कंपनी आहे.

या कंपन्यांस आता भारतीय बाजार खुला होईल. हे सर्व पाहून एन्रॉन समुद्रात बुडवण्याची भाषा करणाऱ्यांनाच त्याचे कसे पुनर्वसन करावे लागले त्याचे, 'आधार'ला विरोध करणाऱ्यांनी 'आधार'सक्ती केली त्याचे, वा 'जीएसटी' नको म्हणणाऱ्यांनीच तो कसा गोड मानून घेतला इत्यादी सर्वांचे वा यातील काहींचे स्मरण झाल्यास आश्चर्य नाही. असो. उशीर झाला म्हणून शहाणपणाचे महत्त्व काही कमी होत नाही. 'लोकसत्ता'कडून या अर्थसंकल्पी निर्णयांचे स्वागत.तथापि यातून देश म्हणून आपली धोरण-धरसोड तितकी दिसते आणि त्याचमुळे भारताबाबत परदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार अधिक सावधगिरी का बाळगतात, हेही समजून घेता येते. ही आपल्याबाबतची सावधगिरीची भावना कमी होण्यास हा अर्थसंकल्प उपयोगी ठरतो, असे ठामपणे म्हणता येत नाही. याचे कारण दीर्घकालीन धोरणांपेक्षा तत्कालिक राजकीय लाभाचाच विचार अलीकडे आपल्या अर्थसंकल्पातून समोर येतो. ताजा अर्थसंकल्प त्यास अपवाद नाही. एकदा कारखानदारांवर सवलतींचा वर्षाव करायचा, त्यांचे गोडवे गायचे, श्रेय घ्यायचे आणि त्याचा जमिनीवरील परिस्थिती बदलण्यात काहीही फायदा झालेला नाही हे लक्षात आल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे आणि सवलतींसाठी नवे गिऱ्हाईक शोधायचे; असा हा खाक्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रवादी-शिंदे गटात वादाची ठिणगी?

## मतभेद नाहीत किंवा नाराजीही नाही : रामदास कदम

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर मंत्रिमंडळाचं वाटप, खातेवाटप आणि पालकमंत्री पदाचंही वाटप करण्यात आलं. खातेवाटपानंतर आणि पालकमंत्री पदाच्या वाटपानंतर महायुतीमधील शिवसेना (शिंदे) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात होतं. यातच अद्यापही रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरु आहे. या वादानंतर रायगडच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिलेली आहे.**



दरम्यान, असं असतानाच आता शिवसेना (शिंदे) नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) कार्यकर्त्यांवर एक आरोप केला आहे. ‘निवडणुकीत राष्ट्रवादीच्या ९० टक्के कार्यकर्त्यांनी योगेश कदम यांचं काम केलं नाही’, असा आरोप रामदास कदम यांनी केला. एवढंच नाही तर आपण याबाबत सुनील तटकरे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिंदे गटात वादाची ठिणगी पडल्याची चर्चा रंगली आहे.“राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांचा उजवा हात असलेल्या गावांमध्ये देखील योगेश कदम यांना मते मिळालेली नाहीत. याबाबत मी सुनील तटकरे यांची भेट घेऊन सांगणार आहे. मात्र, असं असलं तरी आमचे कुठेही मतभेद नाहीत किंवा नाराजीही नाही. कारण सुनील तटकरे यांच्या मनामध्ये असं कदापि येणार नाही. याची मला कल्पना आहे. मात्र, सुनील तटकरे यांच्या कार्यकर्त्यांनी मग त्यामध्ये मंडणगड तालुका प्रमुख असेल किंवा दापोलीचा तालुका प्रमुख असेल, जवळपास ९० टक्के लोकांनी योगेश कदम यांचं काम केलं नाही. याचा अनुभव आम्ही निवडणुकीत घेतला. यासंदर्भात मी सुनील तटकरे यांच्याकडे लेखी तक्रार करणार आहे. त्यांनी याची दखल घ्यावी”, असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या आरोपानंतर खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिलं. ते म्हणाले, “शिवसेनेचे (शिंदे) नेते रामदास कदम हे जेव्हा माझ्याकडे तक्रार करतील तेव्हा मी नक्कीच त्यासंदर्भातील माहिती घेईल. कारण दापोली, खेड, मंडणगड, गुहागर हा विभाग माझ्या लोकसभा मतदारसंघात येतो. त्यामुळे रामदास कदम यांनी मला पत्र द्यावं. त्यांच्या पत्राची मी दखल घेईल. लोकसभा निवडणुकीत काय घडलं? विधानसभेच्या निवडणुकीत काय घडलं? याची माहिती मी घेईल”, असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. एवढंच नाही तर आपण याबाबत सुनील तटकरे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिंदे गटात वादाची ठिणगी पडल्याची चर्चा रंगली आहे.“राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांचा उजवा हात असलेल्या गावांमध्ये देखील योगेश कदम यांना मते मिळालेली नाहीत. याबाबत मी सुनील तटकरे यांची भेट घेऊन सांगणार आहे. मात्र, असं असलं तरी आमचे कुठेही मतभेद नाहीत

### तटकरे यांनी स्पष्टीकरण दिलं

किंवा नाराजीही नाही. कारण सुनील तटकरे यांच्या मनामध्ये असं कदापि येणार नाही. याची मला कल्पना आहे. मात्र, सुनील तटकरे यांच्या कार्यकर्त्यांनी मग त्यामध्ये मंडणगड तालुका प्रमुख असेल किंवा दापोलीचा तालुका प्रमुख असेल, जवळपास ९० टक्के लोकांनी योगेश कदम यांचं काम केलं नाही. याचा अनुभव आम्ही निवडणुकीत घेतला. यासंदर्भात मी सुनील तटकरे यांच्याकडे लेखी तक्रार करणार आहे. त्यांनी याची दखल घ्यावी”, असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या आरोपानंतर खासदार सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिलं.

# शिवसेनेच्या दोन मंत्र्यांमध्ये जुंपली?

## संजय शिरसाट काय म्हणतात त्याला महायुतीत महत्त्व नाही

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही दिवसांपासून महायुतीच्या सरकारमध्ये नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून वाद सुरु असल्याची चर्चा आहे. नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा प्रश्न लवकरच सोडवला जाईल असं महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांकडून सांगितलं जात आहे. असं असतानाच मंत्री संजय शिरसाट यांनी शिवसेना (शिंदे) आणि शिवसेना (ठाकरे) या दोन्ही शिवसेना एकत्र येण्याच्या संदर्भात एक विधान केलं.**

त्यांच्या विधानानंतर महायुतीत खळबळ उडाली. यानंतर आता शिवसेना (शिंदे) पक्षाच्या दोन मंत्र्यांमध्ये जुंपल्याचं पाहायला मिळत आहे. शिवसेनेचे मंत्री योगेश कदम यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या विधानाच्या पार्श्वभूमीवर बोलताना मोठं भाष्य केलं. “संजय शिरसाट काय म्हणतात त्याला महायुतीत काही महत्त्व नाही”, असं योगेश कदम यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याची चर्चा रंगली आहे.“शिवसेना (शिंदे) पक्षाची भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठरवत असतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जेव्हा उठाव केला तेव्हा आम्ही सर्व अधिकार मग त्यामध्ये पक्षाचे आणि निर्णयाचे सर्व अधिकार फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच दिलेले आहेत. ते अधिकार दुसरे कोणालाही नाहीत. त्यामुळे मंत्री संजय शिरसाट हे काय



म्हणतात त्याला महायुतीमध्ये काही महत्व नाही. कारण ते त्यांचं वैयक्तिक मत आहे”, असं योगेश कदम यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट एकत्र येण्याच्या संदर्भात मंत्री संजय शिरसाट यांनी भाष्य केलं होतं. त्यांनी म्हटलं होतं की, “मला वाटतं त्यांनी (उद्धव ठाकरे यांनी) दोन पावलं मागे आलं पाहिजे. मात्र, सध्याच्या परिस्थितीत एकनाथ शिंदे आणि त्यांचं (उद्धव ठाकरे) सुत जमेल असं वाटत नाही. मात्र, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आली तर माझ्या काही मर्यादा आहेत. मी एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत जाऊ शकतो. मी त्यांना बोलू शकतोअसं संजय शिरसाट यांनी टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं होतं. दरम्यान, मंत्री संजय शिरसाट यांच्या या विधानानंतर भाजपाच्या नेत्यांनीही प्रतिक्रिया दिल्या. मंत्री नितेश राणे यांनी यासंदर्भात बोलताना म्हटलं की, “संजय शिरसाट यांनी तसे प्रयत्न करत रहावे. मात्र, एकनाथ शिंदे यांचं त्याबाबत मत काय आहे आणि त्यांच्या सर्व आमदारांचं काय मत आहे? याबाबतही विचार करावा. संजय शिरसाट हे मित्र आहेत. पण त्यांचा आता संजय राजाराम राऊत होऊ नये अशी अपेक्षा आहे”, असं म्हणत नितेश राणे यांनी खोचक टीका केली.

### ते अधिकार दुसरे कोणालाही नाहीत

“संजय शिरसाट काय म्हणतात त्याला महायुतीत काही महत्त्व नाही”, असं योगेश कदम यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याची चर्चा रंगली आहे.“शिवसेना (शिंदे) पक्षाची भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठरवत असतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जेव्हा उठाव केला तेव्हा आम्ही सर्व अधिकार मग त्यामध्ये पक्षाचे आणि निर्णयाचे सर्व अधिकार फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच दिलेले आहेत. ते अधिकार दुसरे कोणालाही नाहीत. त्यामुळे मंत्री संजय शिरसाट हे काय म्हणतात त्याला महायुतीमध्ये काही महत्त्व नाही. कारण ते त्यांचं वैयक्तिक मत आहे.

# कानडा राजा पंढरीचा 55 वर्षांपासून चर्चेत!

## जयपूर महोत्सवात 'विठ्ठल विठ्ठल'चा गजर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जयपूर या ठिकाणी ३० जानेवारी ३ फेब्रुवारीपर्यंत जयपूर साहित्य महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या पाच दिवसीय कार्यक्रमात विठ्ठल विठ्ठलचा गजर झाला आणि संदीप नारायण यांनी गायलेल्या कानडा राजा पंढरीचा या गाण्याला उभं राहून सगळ्या उपस्थितांनी अभिवादन केलं. या महोत्सवात ४७ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. ३१ नोबेल पुरस्कार विजेते आणि पुलित्झर पुरस्कार विजेते लेखकही या साहित्य महोत्सवात सहभागी झाले आहेत.**




संदीप नारायण यांची मैफिल या साहित्य महोत्सवात आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीत त्यांच्या बंदिशींमध्ये उपस्थित प्रेक्षक वर्ग स्वर्गीय सुखाचा आनंद घेत होते. या मैफिलीत संदीप नारायण यांनी 'कानडा राजा पंढरीचा गाणं' म्हटलं. कानडा राजा पंढरीचा हे मराठी गाणं म्हणताच उपस्थित रसिक प्रेक्षक विठ्ठल विठ्ठल हा गजर करु लागले आणि टाळ्या वाजवू लागले. विठ्ठल विठ्ठल हा गजर करत अनेक उपस्थितांनी संदीप नारायण यांच्या गायनाला अभिवादन दिलं. कानडा राजा पंढरीचा हे मराठी गाणं गाऊन नमस्काराचे हात जोडलेले संदीप नारायण आणि त्यांच्या समोर उभे असलेले प्रेक्षक या वातावरणामुळे जयपूर महोत्सवच विठ्ठल भक्तीत न्हाऊन निघाला.कानडा राजा पंढरीचा हे गाणं गीतकार ग.दि. माडगूळकर यांनी लिहिलं आहे. झाला महार पंढरीनाथ या चित्रपटात हे गाणं आहे. पंडित वसंतराव देशपांडे आणि सुधीर फडके यांनी हे गाणं गायलं आहे तर या गाण्याला संगीत लाभलं आहे ते आपल्या सगळ्यांचे लाडके बाबूजी सुधीर फडके यांचं. आजही हे गाणं अनेक मैफिलींमधून सादर होत असतं. वसंतराव देशपांडेचे नातू राहुल देशपांडे आणि महेश काळे यांनीही अनेक मैफिलींमध्ये हे गाणं म्हटलं आहे. तीन-चार वर्षांपूर्वी आलेल्या 'भाई' या पु.ल. देशपांडेंवरच्या आयुष्यावरील चित्रपटातही या गाण्याचा समावेश करण्यात आला होता.कानडा राजा पंढरीचा हे गाणं गेल्या ५५ वर्षांपासून आपल्याला भुरळ घालतं आहे. कारण हे गाणं 'झाला महार पंढरीनाथ' या १९७० मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात होतं. तेव्हापासून विठ्ठलाच्या भक्तीत लीन होणाऱ्या भाविकांसाठी हे गाणं म्हणजे पर्वणीच ठरलं आहे. याच पर्वणीचा प्रत्यय जयपूर महोत्सवात रसिक प्रेक्षकांनी घेतला.पंढरपूरच्या विठोबाला कानडा राजा म्हटलं गेलं आहे. विठूरायाचं दर्शन राजा कृष्णदेवरायाने घेतलं त्याने विठ्ठलाचं हरण करुन कर्नाटकात नेलं, त्यानंतर विठ्ठलाची मूर्ती हंपीतल्या देवळात ठेवली. मात्र संत एकनाथांचे आजोबा भानुदास महाराज यांनी विठ्ठलाला पुन्हा पंढरपूरला आणलं. कर्नाटकात वास्तव्य केलं त्यामुळे त्याला कानडा राजा पंढरीचा असं म्हटलं जातं, अशी अख्यायिका आहे. कानडा हा शब्द ज्ञानेश्वरीतही आढळतो. कनाडा आणि कर्नाटकू अशी दोन विशेषणं संत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाला लावली आहेत. गदिमांनी गीतात कानडा राजा पंढरीचा असं वर्णन त्यांनी केल्याचं दिसतं. कानडा या शब्दाचा अर्थ गूढ, अगम्य असाही होतो. तर कर्नाटकू म्हणजे विविध प्रकारच्या लीला दाखवणारा असंही काही अभ्यासक सांगतात. हंपी या ठिकाणी विठ्ठल मंदिर आहे मात्र त्यात विठ्ठलाची मूर्ती नाही. ती विठ्ठलाची मूर्ती म्हणजेच पंढरपूरच्या मंदिरातील विठोबा. कर्नाटकात मूर्तीरुपाने राहिलेला विठ्ठल महाराष्ट्रात आल्याने त्याला कानडा म्हटलं गेलं आहे.

### जयपूर विठ्ठल भक्तीत न्हाऊन निघाला

संदीप नारायण यांची मैफिल या साहित्य महोत्सवात आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीत त्यांच्या बंदिशींमध्ये उपस्थित प्रेक्षक वर्ग स्वर्गीय सुखाचा आनंद घेत होते. या मैफिलीत संदीप नारायण यांनी 'कानडा राजा पंढरीचा गाणं' म्हटलं. कानडा राजा पंढरीचा हे मराठी गाणं म्हणताच उपस्थित रसिक प्रेक्षक विठ्ठल विठ्ठल हा गजर करु लागले आणि टाळ्या वाजवू लागले. विठ्ठल विठ्ठल हा गजर करत अनेक उपस्थितांनी संदीप नारायण यांच्या गायनाला अभिवादन दिलं. कानडा राजा पंढरीचा हे मराठी गाणं गाऊन नमस्काराचे हात जोडलेले संदीप नारायण आणि त्यांच्या समोर उभे असलेले प्रेक्षक या वातावरणामुळे जयपूर महोत्सवच विठ्ठल भक्तीत न्हाऊन निघाला.कानडा राजा पंढरीचा हे गाणं गीतकार ग.दि. माडगूळकर यांनी लिहिलं आहे. झाला महार पंढरीनाथ या चित्रपटात हे गाणं आहे. पंडित वसंतराव देशपांडे आणि सुधीर फडके यांनी हे गाणं गायलं आहे तर या गाण्याला संगीत लाभलं आहे ते आपल्या सगळ्यांचे लाडके बाबूजी सुधीर फडके यांचं. आजही हे गाणं अनेक मैफिलींमधून सादर होत असतं.

# ISIS च्या तळांवर अमेरिकेचं एअर स्ट्राइक

## दहशतवाद्यांचा खात्मा केल्यानंतर ट्रम्प यांची पोस्ट

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या महिन्यात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. यामध्ये त्यांनी आता दहशतवादाविरोधातील आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत आहे.**

अशात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी रात्री घोषणा केली की, अमेरिकन सैन्याने सोमालियातील आयसिसच्या ठिकाणांवर हवाई हल्ले केले आहेत, ज्यामध्ये अनेक दहशतवादी मारले गेले आहेत. ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले की, "आज सकाळी मी सोमालियामध्ये आयसिसच्या एका वरिष्ठ हल्लेखोरावर आणि त्याने भरती केलेल्या दहशतवाद्यांवर लष्करी हवाई हल्ल्याचे आदेश दिले होते. हे दहशतवादी गुहांमध्ये लपले होते, पण आम्ही त्यांच्यावर अचूक हल्ला केला. ते अमेरिका आणि आमच्या मित्र राष्ट्रांसाठी धोकादायक होते.ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये पुढे स्पष्ट केले की, "अमेरिकेने हवाई हल्ल्यांनी, ज्यामध्ये दहशतवादी लपले होते त्या गुहा उद्ध्वस्त केल्या आहेत. नागरिकांना कोणतीही हानी न पोहोचवता अनेक दहशतवादी मारले गेले आहेत."आमच्या




सैन्याने गेल्या अनेक वर्षांपासून या आयसिस हल्ल्यांचे नियोजन करणाऱ्याला लक्ष्य केले आहे, परंतु बायडेन आणि त्याच्या साथीदारांनी हे काम पूर्ण करण्यासाठी पुरेशी जलद कारवाई केली नाही. मी केली! अमेरिकन लोकांवर हल्ला करणाऱ्या आयसिस आणि इतर सर्वांना संदेश आहे की, आम्ही तुम्हाला शोधून शोधून मारू", असे ट्रम्प यांनी आपल्या पोस्टच्या शेवटी म्हटले आहे. दरम्यान, संरक्षण सचिव पीट हेगसेथ म्हणाले की, "अमेरिकन सैन्याच्या आफ्रिका कमांडने केलेले हल्ले ट्रम्प यांनी निर्देशित केले होते आणि यासाठी सोमालिया सरकारशी समन्वय साधला होता." पेंटागॉनच्या (अमेरिकन संरक्षण विभाग) सुरुवातीच्या अंदाजानुसार, या हल्ल्यांमध्ये अनेक दहशतवादी मारले गेले आहेत. पेंटागॉनने असेही म्हटले आहे की, त्यांच्या मूल्यांकनानुसार, या हल्ल्यांमध्ये कोणत्याही नागरिकाचे नुकसान झाले नाही.

### सीरियामध्ये अमेरिकेची कारवाई

शनिवारी सोमालीयात कारवाई करण्यापूर्वी, ३० जानेवारी रोजी वायव्य सीरियामध्ये अमेरिकन सैन्याच्या हवाई हल्ल्यात हुर्रस अल-दीनचा एक अव्वल दहशतवादी मारला गेला. हुर्रस अल-दीन हा अल-कायदाशी संबंधीत गट आहे. यूएस सेंट्रल कमांडने याला दुजोरा दिला आहे.गेल्या महिन्यात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. यामध्ये त्यांनी आता दहशतवादाविरोधातील आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

## योगिताने पुन्हा जिंकली मनं

'बिग बॉस मराठी'मध्ये झळकलेली योगिता चव्हाण नेहमी चर्चेत असते. सोशल मीडियावरील ट्रेंड होणाऱ्या गाण्यांवर ती जबरदस्त डान्स करत असते. त्यामुळे आता तिच्या डान्सचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. नुकताच योगिताने आणखीन एक डान्स व्हिडीओ शेअर करत पुन्हा एकदा एक्सप्रेशनने चाहत्यांची मनं जिंकली आहेत.'जीव माझा गुंतला' मालिकेतून घराघरात पोहोचलेली अंतरा म्हणजे अभिनेत्री योगिता चव्हाण 'बिग बॉस मराठी'मुळे प्रसिद्धी झोतात आली. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात योगिता चव्हाण झळकली होती. अभिनेता सौरभ चौघुलेबरोबर लग्न केल्यानंतर सात महिन्यांनी योगिता 'बिग बॉस मराठी'मध्ये पाहायला मिळाली. पण या वादग्रस्त शोमध्ये तिचा जास्त काळ टिकाव लागला नाही.

काही दिवसांत योगिता घराबाहेर झाली. परंतु, 'बिग बॉस'मधून बाहेर झाल्यापासून तिच्या डान्स कौशल्याची चर्चा नेहमी रंगली असते. योगिताने 'बिग बॉस'मध्ये जबरदस्त डान्स केला असता तर ती जास्त काळ टिकली असती, अशा नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया तिच्या डान्स व्हिडीओवर उमटल्या आहेत.नुकताच योगिताने सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत असलेल्या 'उई अम्मा' गाण्यावर डान्स केला आहे. बॉलीवूड अभिनेत्री रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी राशा थडानीच्या 'उई अम्मा' गाण्यावर योगिताने आपल्या एक्सप्रेशनने पुन्हा सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

## तेजश्री प्रधानच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट'

मराठी मालिकाविश्वातील आघाडीची अभिनेत्री म्हणजे तेजश्री प्रधान. तेजश्रीने आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे तिची कोणतीही भूमिका असो, ती सुपरहिट होतेच. जान्हवी असो, शुभ्रा असो किंवा मुक्ता तिची प्रत्येक भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली आहे. पण, काही दिवसांपूर्वी तेजश्री प्रधानने खूप मोठा निर्णय घेतला. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केला. तिच्या या अचानक झालेल्या निर्णयामुळे चाहत्यांना धक्काच बसला.अभिनेत्री तेजश्री प्रधानने 'प्रेमाची गोष्ट' मालिका सोडण्यामागचं अद्याप कारण स्पष्ट केलेलं नाही. पण, 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्रीची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. आता मालिकेत मुक्ताच्या भूमिकेत स्वरदा पाहायला मिळत आहे. पण तेजश्री आणि 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चाहत्यांनी अजूनही मुक्ता म्हणून स्वरदाला स्वीकारलेलं दिसत नाहीये. मालिकेच्या प्रत्येक प्रोमोवर 'जुन्या मुक्ताला परत आणा', 'तेजश्री पाहिजे होती', 'टीआरपी घसरणार' अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांच्या पाहायला मिळत आहेत. आता तेजश्रीच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला मोठा फटका बसल्याचं समोर आलं आहे.सध्या मालिकेसाठी महत्त्वाची गोष्ट आहे टीआरपी. काही दिवसांपूर्वी १८ जानेवारी ते २४ जानेवारीपर्यंतचा टीआरपी रिपोर्ट समोर आला.

## सई देणार खास सरप्राईज



मालिका, चित्रपटसृष्टी व वेब सीरिज अशा मनोरंजनाच्या तिन्ही माध्यमांतून अभिनेत्री सई ताम्हणकरने मोठं नाव कमावलं आहे. सई कायम वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिका साकारताना दिसते. सई सोशल मीडियावरही कायम सक्रिय असते. ती कायम तिच्या खासगी आयुष्यासह कामाबद्दल विविध अपडेट्स देत असते. नुकतीच तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करीत तिच्या आगामी प्रोजेक्टची माहिती दिली आहे.सईने नुकतीच तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये सईचा नेटफ्लिक्स प्लॅटफॉर्मवरील एक फोटो आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये तिने लवकरच सर्वांसाठी एक खास सरप्राईज असल्याचं म्हटलं आहे. तसेच "३ फेब्रुवारी रोजी नेटफ्लिक्सवर काय आहे ते तुम्ही शोधा", असं तिनं यात लिहिलं आहे.सईची ही पोस्ट तिच्या आगामी वेब सीरिजबाबत आहे. ती लवकरच 'डब्बा कार्टेल' या नव्या वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामध्ये सई एका पोलीस अधिकाऱ्यांच्या भूमिकेत दिसणार आहे. सईने शेअर केलेल्या पोस्टप्रमाणे 'डब्बा कार्टेल' या वेब सीरिजचा ऑफिशियल ट्रेलर उद्या म्हणजेच ३ फ्रेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## भारती सिंगला अश्रू झाले अनावर

'द ग्रेट इंडियन लाफ्टर चॅलेंज, 'कॉमेडी सर्कस ३ का तड़का', 'कॉमेडी सर्कस महासंग्राम', 'द कपिल शर्मा शो', 'कॉमेडी सर्कस के महाबली', 'कॉमेडी दंगल' अशा विविध कार्यक्रमांतून प्रसिद्ध अभिनेत्री भारती सिंगने मोठी ओळख मिळवली आहे. तिच्या विनोदाचे लाखो चाहते आहेत. भारतीने आपल्या विनोदी अभिनयाने फार कमी काळात चाहत्यांची मोठ्या प्रमाणात पसंती मिळवली आहे. तिने आजवर साकारलेली अनेक विनोदी पात्रे तुफान गाजली आहेत. त्यातील लल्ली हे एका लहान मुलीचं पात्र प्रेक्षकांना फार आवडलं होतं. अशात भारतीने नुकताच बॉलीवूडच्या किंग खान म्हणजेच शाहरुख खानबरोबरचा 'कॉमेडी नाइट्स बचाओ'मधील एक किस्सा सांगितला आहे. भारती सिंग नुकतीच 'द ठगेश शो'मध्ये आली होती. यावेळी तिने शाहरुख खानबरोबरचा 'कॉमेडी नाइट्स बचाओ'मधील एक किस्सा सांगितला आहे. या शोमध्ये भारतीने शाहरुख खानला तिने साकारलेली 'लल्ली' ही भूमिका करण्यास सांगितले होती. तिच्या एका शब्दावर शाहरुख ही भूमिका करण्यासाठी तयार झाला होता. हा किस्सा सांगताना भारती म्हणाली, "त्यावेळी त्या इंडस्ट्रीमध्ये मी नवीन होते आणि गावावरून आले होते. तेव्हा माझ्या मनात शंका होती, शाहरुख खान सर खरोखर लल्ली हे पात्र साकारतील की नाही?" "मला शाहरुख यांच्याबद्दल त्यावेळी फारशी कल्पना नव्हती. कारण- मी तोपर्यंत 'मन्नत'सुद्धा पाहिलं नव्हतं. शोमध्ये मी शाहरुख सरांना म्हणाले की, सर तुम्ही 'लल्ली'प्रमाणे तयार व्हाल का? ते लगेचच हो म्हणाले.

## श्रेयाच्या वाढदिवसानिमित्त कुशलची खास पोस्ट



'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाने महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांना अनेक वर्षे खळखळून हसवले. त्यातील कुशल बद्रिके, भाऊ कदम, श्रेया बुगडे, सागर कारंडे, भारत गणेशपुरे, नीलेश साबळे हे कलाकार आणि त्यांच्या विनोदाने सर्वांना भुरळ घातली होती. श्रेया बुगडेने या कार्यक्रमात साकारलेल्या अनेक भूमिका आजही तिच्या चाहत्यांना पाहाव्याशा वाटतात. अशात आज श्रेयाचा वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त कुशल बद्रिकेने तिच्यासाठी एक विनोदी पोस्ट शेअर केली आहे.कुशल बद्रिकेने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. त्यामध्ये दोघेही 'कोस्टा कॅफे'समोर उभे आहेत. त्यावर कुशल श्रेयाला म्हणतो की, आपल्या आई-बाबांनी आपल्याला किती कष्टानं वाढवलं आहे ना... त्यावर श्रेया म्हणते हो खरं आहे. पण, त्यांच्या आई- बाबांनी यांना कोस्टानं वाढवलं आहे आणि दोघेही 'कोस्टा कॅफे'कडे पाहतात. हा मजेशीर विनोदी व्हिडीओ पोस्ट करीत कुशलने त्यावर कॅप्शनमध्ये श्रेयाबरोबर त्याची मैत्री कशी आहे हे व्यक्त केलं आहे."श्रेया यार तुला भेटल्यावर माझी खात्री पटली की, लग्नाच्या गाठी जशा "स्वर्गात" बांधल्या जातात. तशाच मैत्रीच्या गाठी ह्या "नरकात" बांधल्या जातात. आपण सोबत असलो तर नरकातल्या शिक्षासुद्धा आनंदाने भोगू. अमुक एक शिक्षा अनुभवायची असेल तर काय किडे करावे लागतात हे विचारून तेसुद्धा पूर्ण करू पण एकट्याने स्वर्ग गाठायची वेळ आलीच तर... नकोसा होईल तो, स्वर्गसुद्धा नरक वाटेल!", असं कुशलने कॅप्प्रमध्ये लिहिलं आहे. तसेच पुढे त्याने लिहिले, "म्हणून सांगतो 'माझ्यासारखं' थोडं थोडं पुण्य करत जा अधूनमधून, बाकी मी स्वर्गात वशिला लावतो तुझा. टेन्शन नाय!! आणि हो वाढदिवसाच्या शुभेच्छा." श्रेया बुगडे आणि कुशल बद्रिके या दोघांची मैत्री किती खास आहे हे त्याने शेअर केलेली पोस्ट पाहून समजत आहे.कुशलने शेअर केलेल्या या पोस्टवर श्रेयानेही मजेशीर कमेंट केली आहे. तिने यावर कुशलला थेट प्रश्न विचारला आहे. "माझ्या वाढदिवसाला तू हे पोस्ट करणार आहेस हे तू मला का सांगितलं नाहीस?, मला कॉल कर...", असं श्रेयाने यावर कमेंट करीत लिहिले आहे. श्रेया आणि कुशल दोघेही नुकतेच 'झी मराठी' वाहिनीच्या 'मकर संक्रांत विशेष उत्सव गोड नात्यांचा' मध्ये झळकले होते. येथेही दोघांनी त्यांच्या विनोदी शैलीने प्रेक्षकांना खळखळून हसवले. कुशल बद्रिकेच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास 'चला हवा येऊ द्या'नंतर तो 'मॅडनेस मचायेंगे' या कार्यक्रमात दिसला होता.

# त्रिशाचा टी-20 विश्वचषकात वर्ल्ड रेकॉर्ड!

## अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर विजयाचा पाया रचला

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अंडर-१९ महिला विश्वचषकामध्ये गोंगाडी त्रिशा ही भारताची नवी स्टार खेळाडू म्हणून समोर आली आहे. एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू असलेल्या त्रिशा गोंगाडी हिने अंतिम सामन्यात कमालीची कामगिरी केली. त्रिशाने आपल्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारताच्या वर्ल्डकप विजयाचा पाया रचला. त्रिशाने अंतिम फेरीत ३ विकेट्स घेत ४४ धावांनी नाबाद खेळी केली. यासह तिला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.**




अंतिम सामन्यापूर्वीच्या १० डावांमध्ये सलामीवीर त्रिशाने ६४.८ च्या सरासरीने एक शतक, दोन अर्धशतकं आणि दोन वेळा ४० धावांचा टप्पा गाठला. त्रिशाने वयाच्या दुसऱ्या वर्षीच क्रिकेटला सुरुवात केली होती, यामागचं कारण म्हणजे क्रिकेटचं वेड असलेले तिचे वडील. तिच्या वडिलांनी त्रिशाला क्रिकेटचे धडे देत भारताला एक नवी स्टार खेळाडू दिली आहे.गोंगाडी त्रिशा हिने अंडर-१९ महिलांच्या विश्वचषकात शतक झळकावत मोठा विक्रम रचला. त्रिशापूर्वी अंडर-१९ महिलांच्या टी-२० विश्वचषकात कोणत्याच खेळाडूने शतक झळकावले नव्हते, ते त्रिशाने करून दाखवलं. त्रिशाने स्कॉटलंडविरूद्ध सुपर सिक्स सामन्यात ५७ चेंडूत ११० धावांची दमदार खेळी केली. यासह त्रिशाने संपूर्ण स्पर्धेत विक्रमी ३०९ धावा केल्या, यामुळेच तिला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कारही मिळाला. त्रिशाने हा पुरस्कार तिच्या वडिलांनी समर्पित केला. इंडियन एक्सप्रेसशी बोलताना त्रिशाच्या वडिलांनी तिच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. त्रिशा मैदानात मोठमोठे फटके खेळण्यासाठी ओळखली जाते, ती फिरकी आणि वेगवान गोलंदाजांविरूद्धही चांगले फटके खेळताना दिसली आहे. त्रिशाच्या मोठे फटके खेळण्याच्या मसल मेमरीबाबत तिच्या वडिलांनी सांगितलं की, "मसल मेमरीमध्ये मोठे फटके आत्मसात करण्यासाठी जास्तीत जास्त चेंडू खेळावे लागतात. जर लहान वयातच मुलांच्या आजूबाजूला काही गोष्टी सातत्याने होत असतील ते त्या अधिक प्रकर्षाने आत्मसात करतात.

त्यामुळे बॅटवर येणारा चेंडू कोणता हे समजेल आणि ते कॉऑर्डिनेशन ती विकसित करेल."जेव्हा त्रिशा चार वर्षांची होती, तेव्हा तिच्या वडिलांनी तिला जिममध्ये नेण्यास सुरुवात केली, जिथे ते इन्स्ट्रक्टर म्हणून काम करत होते.

मग त्याने कॉंक्रीटची खेळपट्टी बनवली आणि भद्राद्री ज्युनियर कॉलेजमध्ये काही नेट बांधले, जिथे त्यांनी तिला किमान एक हजार चेंडू टाकून सराव करून घेतला. पण इतक्या लहान मुलीला एवढं ओझ टाकणारे वडील म्हणून नाव ठेवण्यापूर्वी त्यांनी या सरावामागचं कारण सांगितलं, त्रिशाचे बाबा म्हणाले. "सामान्यतः, सर्वच आठ वर्षांच्या आसपास सरावाला सुरूवात करतात, परंतु त्या टप्प्यावर खूप स्पर्धा सुरू असते. म्हणून मी ती २ वर्षांची झाल्यापासूनच सरावाला सुरूवात केली. एकच आयुष्य आहे आणि मी तिला सर्वोत्तम देण्याचा निर्णय घेतला."त्रिशाचे वडील रामी रेड्डी यांनी घेतलेल्या या मेहनतीचं त्रिशाने वर्ल्डकपमध्ये मोठी कामगिरी करत नाव कमावत चीज केलं. तिच्या वडिलांनी सुरूवातीच्या काळात घेतलेल्या मेहनतीमुळेच त्रिशा आंतरराष्ट्रीय शतक झळकावणारी पहिली U19 भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आणि ज्युनियर टी-२० विश्वचषकातील भारताची सर्वात मोठी स्टार खेळाडू म्हणून समोर आली.मुली ज्या वयात बाहुली आणि भातुकलीचा खेळ खेळतात त्या वयात २ वर्षांच्या त्रिशाला तिच्या वडिलांनी प्लास्टिकची बॅट आणून दिली. वडील तिला प्लॅस्टिक किंवा मऊ टेनिस बॉलने गोलंदाजी करायचे, जेणेकरून बॅटने तो गोलाकार चेंडू बाजूला करणे हे तिच्या सुरूवातींच्या सवयींमध्ये तिच्या डोक्यात पक्क होईल.

### दिवसातील आठ तास क्रिकेटला

तेलंगणाच्या राजधानीपासून ३०० किलोमीटर अंतरावर असलेल्या भद्राचलम शहरात गेल्यानंतर त्यांनी क्रीडापटू होण्याच्या स्वप्नावर पूर्णविराम लावला. या शहरातील क्रिकेट सुविधा मूलभूत होत्या, परंतु तिचे वडिल रेड्डी यांनी तिला फिट ठेवण्यासाठी अनेक कष्ट घेतले. "मी तिच्या सरावाला लवकर सुरुवात केली आणि तिच्या सांध्यावर जास्त भार पडणार याची खात्री घेतली. मी हे सर्व शास्त्रोक्त पद्धतीने केलं," असं रेड्डी म्हणाले.ती लहानपणापासूनच खूप खेळायची आणि सराव करायची म्हणून आम्हाला भरपूर प्रोटिने असलेले पदार्थ तिला देत असू," असं रेड्डी पुढे म्हणाले.त्रिशाला क्रिकेटपटू बनवण्याची तिच्या वडिलांमध्ये इतकी जिद्द होती की त्यांनी तिला काही काळ शाळेत पाठवले नाही आणि खाजगी शिकवणीची व्यवस्था केली. "मला वाटले की यामुळे तिच्यावर अधिक दबाव येईल. शेवटी जेव्हा ती शाळेत जाऊ लागल तेव्हा ती तीन तास शाळेत जायची आणि दिवसातील सहा-आठ तास क्रिकेटला द्यायची.

# अभिषेकने मोडला हिटमॅनचा खास विक्रम!

## टी-20 आंतरराष्ट्रीयमध्ये पराक्रम करणारा पहिलाच भारतीय

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वानखेडेवर खेळल्या गेलेल्या चौथ्या टी-२० सामन्यात भारताने अभिषेक शर्मांच्या विक्रम १३५ धावांच्या जोरावर इंग्लंडचा १५० धावांनी दारुण पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्यांच्या मालिका ४-१ ने खिशात घातली. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद २४७ धावा केल्या होत्या.**



यानंतर भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडला ११ व्या षटकात ९७ धावांत गुंडाळले. दरम्यान अभिषेक शर्माने विक्रमी शतकासह रोहित शर्माचा ८ वर्षांनंतर सर्वाधिक षटकारांचा विक्रम मोडला. अभिषेक शर्माने भारतीय डावाच्या अकराव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर अवघ्या ३७ चेंडूत शतक पूर्ण केले. अशाप्रकारे, टी-आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा तो रोहित शर्मानंतरचा दुसरा भारतीय फलंदाज ठरला. यासह अभिषेकने रोहित शर्माचा सर्वात वेगवान शतक झळकावण्याचा विक्रम अवघ्या ३ चेंडूंनी हुकला. रोहितने ३५ चेंडूत सर्वात जलद शतक झळकावण्याचा पराक्रम केला आहे.अभिषेकने आपले शतक पूर्ण केल्यानंतर एका टोकाकडून विकेट पडू लागल्यानंतर धावांचा वेग थोडा मंदावला. असे असतानाही युवा फलंदाज ५४ चेंडूत १३५ धावा करू शकला. आपल्या झंझावाती शतकी खेळीत त्याने केवळ ७ चौकार आणि १३ गगनचुंबी षटकार लगावले.अभिषेकने रोहित शर्माचा ८ वर्षपूर्वीचा जुना विक्रम मोडीत काढला. २०१७ मध्ये इंदूरमध्ये श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या टी-२० सामन्यात रोहितने आपल्या डावात १० षटकार मारले होते. अभिषेक शर्माची १३५ धावांची खेळी ही टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील कोणत्याही भारतीय फलंदाजाने केलेली सर्वोच्च खेळी आहे. अभिषेकने शुबमन गिलचा विक्रम मोडला.

### अभिषेकने मोडला शुबमनचा विक्रम

भारताने अभिषेक शर्माच्या विक्रम १३५ धावांच्या जोरावर इंग्लंडचा १५० धावांनी दारुण पराभव केला. अभिषेकने आपले शतक पूर्ण केल्यानंतर एका टोकाकडून विकेट पडू लागल्यानंतर धावांचा वेग थोडा मंदावला. असे असतानाही युवा फलंदाज ५४ चेंडूत १३५ धावा करू शकला. आपल्या झंझावाती शतकी खेळीत त्याने केवळ ७ चौकार आणि १३ गगनचुंबी षटकार लगावले.याआधी गिलच्या बॅटमधून सर्वात मोठी खेळी झाली होती. गिलने २०२३ साली न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० सामन्यात नाबाद १२६ धावा केल्या होत्या.